# आपला महाराष्ट्र

# धुळे जिल्ह्याचे अस्वस्थ वर्तमान

धुळे जिल्हा आता फक्त चार तालुक्यांचा आहे. प्रस्तावित २० ते २२ जिल्हे पुढच्या काळात होणार आहेत. जळगाव जिल्ह्याचे विभाजन होत असल्यामुळे छोट्याशा धुळे जिल्ह्याचा विस्तार व्हावा म्हणून त्या जिल्ह्यातील काही तालुके धुळे जिल्ह्याला जोडण्याची जी मागणी होती ती आता बासनात गुंडाळली जाईल. म्हणजे धुळे जिल्ह्याचा आकार आहे तेवढाच राहणार आहे. महाराष्ट्रातील जे ३६ जिल्हे आहेत त्यात जवळपास २० जिल्ह्याची भर पडली तर ५६ जिल्हे होतील. म्हणजे राजकीय दृष्ट्या सर्वच जिल्ह्यांचे खच्चीकरण होणार असे दिसते. चार तालुक्याच्या धुळे जिल्ह्याला फारसे राजकीय वजन आता राहिलेले नाही. पूर्वीचा एकत्रित जिल्हा आणि त्यातील नेतृत्वाचा हिशोब केल्यास अतिशय श्रीमंत असा हा जिल्हा होता. परंतु या जिल्ह्यातील राजकारण, समाजकारण आणि अर्थकारण महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात पोहोचलेले होते. कधी जिल्हा परिषद, कधी रॉकेल पेट्रोल, तर कधी सहकारी कारखानदारी फस्त करण्यात जिल्हा सगळ्यात पुढे होता. खरेदी विक्री संघ, शेतकरी सहकारी संघ, दूध संघ, इतर सहकारी प्रकल्प असे सगळेच इथल्या राजकारणाने संपवून टाकले. पुढे विभाजन झाले. दोन जिल्हे अस्तित्वात आले. पण प्रकृती अजून बिघडली. राजकारणात नवी पिढी येईल, अर्थकारणात आणि समाजकारणात नवी पिढी येईल. एक प्रगल्भ आणि निकोप वातावरण तयार होईल अशी अपेक्षा होती पण ती फोल ठरली आणि धर्मांध, घुटनेवादी, डबल स्टँडर्ड, दुतोंडी, फसवेगिरी, भंगारगिरी, डांबर चोरी, केमिकल चोरी, वाहन तोडी, बँकां आणि पतपेढ्यांची दिवाळखोरी असा नवा चेहरा घेऊन नवी संस्कृती जन्माला आली. यात सुधारणा होण्याची शक्यता दिसत नाही. शहराचाच विचार केल्यास सुख वस्तू आणि शांतता प्रिय मध्यमवर्गीय लोक मोठ्या प्रमाणावर पुणे, मुंबई, नाशिक, आणि आसपासच्या प्रगत शहरात जाऊन विसावले आहेत. इथल्या अर्थव्यवस्थेचा कणा असलेले यंत्रमाग उद्योग शेवटचे आचके देत आहेत. त्यांचा कोणी वाली नाही. मग जे लोक आहेत ते ग्रामीण भागातून रोजगारासाठी आलेले, पडेल ते काम करणारे त्यावर आपला उदर निर्वाह चालविणारे लोक आहेत.

दुसरीकडे भू माफिया, वाळू माफिया, मद्य माफिया, टँकर माफिया, खंडणी माफिया असा एक वर्ग सुखेनैव नांदतो आणि आपले पोट भरतो. आपापल्या परिसरात दहशत निर्माण करून पुढारपण करणारे देखील मोठ्या प्रमाणात आहेत. ते सगळे येत्या महापालिकेच्या निवडणुकीत रिंगणात उतरणारे असतील. त्यांच्याकडे महामूर पैसा असेल त्यांची क्रयशक्ती मोठी असेल, त्यातून सहजपणे मतदारांना ते खरेदी करतील. मतदार विकले जातील. त्यांचा उदो उदो करतील. त्यांचे सत्कार करतील. त्यातूनच नेत्याची निवड होईल,उपनेते तेच असतील. सर्व मिळून आज ज्या सुपारी गँगची चर्चा महापालिका वर्तुळात जोरात चालू आहे त्यांचे राज्य पुन्हा येईल. म्हणजे अस्वस्थतेकडून शांततेकडे किंवा निकोप व्यवस्थेकडे प्रवास करण्याऐवजी अस्वस्थतेकडून किंवा अशांततेकडून अशांततेकडे असा प्रवास चालू आहे पुढेही तो असाच चालू राहील. शहरात आणि शहराच्या आसपासच्या परिसरात दरवर्षी १७ ते १८ खून सहजपणे पडतात. काहीच कारण लागत नाही. अगदी परवाचे उदाहरण घेतले तरी लक्षात येईल की खून करण्यास काहीच कारण लागत नाही. किरकोळ वादाचे रूपांतर हाणामारीत होऊन एकाला अगदी सहज संपवून टाकण्यात आले. चोऱ्या चपाट्या तर रोजच चालू आहेत. कधी चोर सापडतात कधी सापडत नाहीत.

परंतु रोजचे वृत्तपत्र चोरीच्या बातमी शिवाय निघत नाही. ही वस्तुस्थिती आहे. सरकारी अधिकाऱ्यांना मारहाण. सामुदायिक अरेरावी, दहशत हे प्रकार तर खुलेआम चालू आहेत. पोलीस खाते त्यातल्या त्यात बऱ्यापैकी काम करीत आहे. खलनिग्रहणाचे काम ते करीत असतात पण सदरक्षणासाठी सगळी जबाबदारी त्यांच्यावर टाकून आम्ही मोकळे होत असतो. प्रशासनातील अधिकारी असो किंवा पोलीस अधिकारी असोत. ते ठराविक काळ असतात. केवळ त्यांच्यावर सुव्यवस्थेची जबाबदारी टाकून मोकळे होता येणार नाही. सुसंस्कृत समाज निर्मितीचे काम इथल्या समाजालाच करावे लागणार आहे. ते होत नाही त्यामुळे या जिल्ह्याची तब्येत बिघडलेली आहे. नंदुरबार मध्ये रिक्षा चालकाने एका मोटरसायकल चालकाला धडक दिल्यानंतर अचानक जमाव चालून येतो आणि तुफान दगडफेक केली जाते दहशत निर्माण केली जाते. त्यामुळे पोलिसांना अश्रू धुराचा वापर करावा लागतो. अशा प्रकारे सगळीकडे लोक बेफाम वागताना दिसत आहेत. अशा प्रकारचा समाज जिथे वावरतो तिथली भावी पिढी कशी निघणार यासाठी वेगळे काही सांगण्याची गरज नाही.

वाळू माफिया नावाची एक जमात मोठ्या प्रमाणावर उदयाला आलेली आहे. तापी आणि तिच्या उपनद्या व्यापाराची आणि त्यातून गड गंज संपत्ती कमावण्याची केंद्रे निर्माण झालेली आहेत. त्यामुळे त्यांच्यात एवढे बळ निर्माण झाले आहे की ते महसुली अधिकाऱ्यांवर हल्ले करतात. त्यांचा खून करू पाहतात. अधून मधून अशा घटना सतत घडतात. सिंदखेड्यात अशाच वर्गातील घटकांनी तेथील पत्रकारावर हल्ला केला. त्यामुळे पत्रसृष्टी दुखावली आहे. कोणी काहीच बोलू नये लिहू नये अशा प्रकारची दहशत निर्माण करण्याचा हा प्रयत्न असावा. दुचाकी वाहने आणि चार चाकी वाहने चोरी करून लीलया पचविणारी मोठी टोळी इथे वर्षानुवर्ष कार्यरत आहे. त्यासंबंधीच्या बातम्या सतत येत राहतात. आणि चर्चा होत राहते. फायनान्स कंपनी, दलाल आणि विक्रेते मिळून एक नवेच मोबाईल फोनचे रॅकेट तयार झाले आहे. महागड्या मोबाईल खरेदी साठी कंपनीशी संपर्क साधून सामान्य ग्राहकाच्या नावाने कर्ज चढवायचे, दो तीन हप्ते मध्यस्थांनी भरायचे आणि मग हळूच ज्याच्या नावावर कर्ज चढले त्याच्या अकाउंट मधून हप्ते कपात करायचे. मोबाईल मात्र परस्पर विक्री करायचे. असा वेगळाच फंडा. अलीकडेच उघडकीस आलेला आहे. पोलीस अधीक्षकांनी याकडे लक्ष देऊन ज्यांनी मोबाईलच खरेदी केलेले नाहीत अशांना आर्थिक गर्तेत लोटून देण्याचे कारस्थान उधळून लावले ही स्वागतार्ह म्हणावी लागेल. मध्यप्रदेशच्या सीमा भागात नेहमीच बनावट मद्य तयार करणाऱ्या टोळ्या कार्यरत असतात. त्यांची धरपकड सतत चालू असते. पण या रॅकेटची साखळी तुटता तुटत नाही एवढी ती जबरदस्त आहे. अशाप्रकारे असंख्य अवैध व्यवसायात कोणीतरी मास्टरमाइंड असतो. कोणीतरी म्होरक्या असतो. त्याला राजकीय संरक्षण असते. त्यांचे मात्र काहीच होत नाही. म्हणून गुन्हेगारी जगत जिल्ह्यात सतत फोफावत असते. खूप धार्मिक कार्यक्रम होतात, कोट्यवधी रुपये खर्च करून कथा होतात, प्रवचने होतात, कीर्तने होतात, कर्मकांड होतात, मोठमोठे संस्कार यज्ञ होतात. शिक्षण संस्थांचे प्रचंड जाळे आहे. तिथेही संस्कारांचाच यज्ञ चालू असतो. तरीही निकोप समाज का निर्माण होत नाही असा प्रश्न पडतो. याचा अर्थ कुठलीच यंत्रणा योग्य दिशेने काम करीत नाही असा होतो. यावर समाज धुरीण एकत्र बसून चर्चा करतील आणि जिल्ह्याचे वातावरण निकोप करतील अशी अपेक्षा आहे.

## आगीवाल स्कूलमध्ये विद्यार्थ्यांसाठी सेमिनार

धुळे, दि.२१- धुळे एज्युकेशन सोसायटीचे डॉ.गुलाबचंद रूपचंद आगीवाल इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये इ.८ वी, ९ वी, १० वी च्या विद्यार्थी व पालकांसाठी करिअर इन ॲग्रीकल्चर सेमिनार आयोजित करण्यात आला. सदर कार्यक्रमासाठी शाळेतील मुख्याध्यापिका सौ.लता शाह व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व पालक उपस्थित होते. प्रमुख अतिथी म्हणून कृषी विज्ञान केंद्र धुळे येथील अमृता राऊत उपस्थित होत्या. राऊत यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन शाळेतील उपशिक्षिका रितू नाथानी यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी कर्मचारी, शर्मा यांचे सहकार्य लाभले. विविध ज्ञान मिळवण्यासाठी शैक्षणिक सहल आयोजित करण्यास विनंतीला होकार कळवला.

## शिंदखेडा येथे संत काशिबा गुरव पुण्यतिथी उत्साहात साजरी



**शिंदखेडा, दि.२१ (प्रतिनिधी)- समाजातील समस्यांचे निराकरण करून प्रगती साध्य करायची असेल तर समाज संघटन ही काळाची गरज आहे, कारण त्यामुळे समाजात चैतन्य पसरते आणि त्यामुळे समाजातील समस्यांचे निश्चितच निराकरण होते असे प्रतिपादन नगरपंचायतीचे गटनेते अनिल वानखेडे यांनी केले.**

येथील गुरव गल्लीत गुरव समाज नवयुवक मंडळ व महिला मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने गुरव समाजाचे आराध्य दैवत संत शिरोमणी काशिबा महाराज गुरव यांच्या पुण्यतिथी निमित्त आयोजित केलेल्या पालखी सोहळ्यानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. सदर पालखी शोभायात्रेने शहरातील नागरिकांचे लक्ष वेधले होते. यावेळी संत काशिबा गुरव यांची प्रतिमा सजवलेल्या बैलगाडीवर काढण्यात आली होती. यावेळी शिंदखेडा नगरपंचायतीच्या माजी नगराध्यक्षा रजनी वानखेडे, गटनेते अनिलजी वानखेडे, हभप भागवताचार्य प्रकाश महाराज जाधव, उदय देसले, भाजयुमोचे जिल्हाध्यक्ष सुरज देसले यांसह समाजातील जेष्ठ श्रेष्ठ नागरिक, महिला व परिसरातील नागरिक मोठ्या संख्यने उपस्थित होते. यावेळी मान्यवरांच्या हस्ते प्रतिमा पूजन व दिपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. प्रास्ताविक मनोज गुरव यांनी केले. हभप भागवताचार्य प्रकाश जाधव यांनी संत परंपरा व त्याचे महत्व या विषयावर मनोगत व्यक्त करत उपस्थितांची मने जिंकली. पालखी मिरवणुकीत भजनी मंडळ भक्तिगीते सादर करीत होते तर डीजे तालावर महिला व लहान मोठे बालके नृत्य सादर करून आनंद व्यक्त करण्यात आला. सदर पालखी शहरातील प्रमुख मार्गावरून निघून रात्री साडे आठ वाजता पालखी मिरवणुकीचे कार्यक्रम स्थळी आगमन झाले. यावेळी सामुहिक आरती करण्यात आली व त्यानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रम यशस्वीतेसाठी सर्व समाज बांधवांसह महिला मंडळ यांनी विशेष परिश्रम घेतले. सूत्रसंचलन कैलास अहिरराव यांनी केले तर आभार मनोज गुरव यांनी मानलेत.

## पिंपळनेर जैन संघटनेची नूतन कार्यकारिणी जाहीर
## शहराध्यक्षपदी दिनेश कोचर, उपाध्यक्षपदी टाटीया



**पिंपळनेर, दि.२१ (प्रतिनिधी)- येथील महावीर भगवान भारतीय जैन संघटनेची पिंपळनेर शहर कार्यकारिणी नुकतीच जाहीर करण्यात आली आहे. यात शहराध्यक्षपदी दिनेश कोचर तर उपाध्यक्षपदी कल्पेश टाटीया यांची निवड करण्यात आली आहे. तसेच कोषाध्यक्षपदी प्रदीप संघवी, सचिवपदी सुनील गोगड यांची नियुक्ती करण्यात आली.**

पिंपळनेर येथे महावीर भवनात झालेल्या एका छोटेखानी कार्यक्रमात ही कार्यकारिणी गठित करण्यात आली. अध्यक्षस्थानी खानदेश विभाग अध्यक्ष चंद्रकांत डागा, उपाध्यक्ष जोशीला पगारिया, कार्यकारिणी सदस्य अजित कटारिया, प्रकाशचंद खिचा, संदीप मुनोत, सचिन कोठारी, निखिल टाटीया, नरेश चोरडिया, अजित टाटीया, मनीष टाटीया, निखिल सांडेचा, अतीश सेठिया, विनयकुमार टाटीया, माजी शहर अध्यक्ष रिखबचंद जैन, प्रतिभा चोरडिया, सुभाष गोगड, सुभाष राका, तुषार चोरडिया, महावीर गोगड, नरेश चोरडिया, कल्पेश टाटीया, महेश टाटीया, दिनेश कोचर, दिनेश गोगड उपस्थित होते. नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना प्रा.डागा यांच्या हस्ते नियुक्तिपत्र देण्यात आले.

प्रा.डागा म्हणाले की, कोणत्याही संघटनेत पद विशिष्ट काळापुरते मर्यादित असते. मात्र, कार्यकर्ता म्हणून संघटनेत स्थान कायम टिकते. कार्यकर्ता हा संघटनेचा आत्मा असतो. मुलांना मूल्यशिक्षण समजावण्याची गरज आहे. भारतीय जैन संघटना एक परिवार आहे. त्यामुळे सर्वांनी प्रतिष्ठा बाजूला करून समाजाचे काम करावे. भारतीय जैन संघटना आता कात टाकते आहे. संघटनेचे काम १२ राज्यात आहे. तसेच महाराष्ट्रात ४५० शाखा असून संघटनेने १४ कार्यक्रम हाती घेतले आहे. त्यात विश्व कर्करोग दिन, शाकाहार दिवस, व्यंजन, यात्रा दिवस, आरोग्य शिबीर, पाणी व्यवस्थापन, दुष्काळ मुक्त महाराष्ट्र, मातृत्व दिन, पर्यावरण दिन आदींचा समावेश असल्याचे ते म्हणाले. सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन दिनेश जैन यांनी केले.



## नवापूरमध्ये साई जलधारेचे आ.नाईक यांच्या हस्ते उद्घाटन

**नवापूर, दि.२१ (प्रतिनिधी) - शहरातील मंगलदास पार्क येथील श्री साईबाबा मंदीरात कै.शांताबाई हिरालाल अग्रवाल यांच्या स्मरणार्थ साई जलधारा (वॉटर फिल्टर) चे उद्घाटन आमदार शिरीषकुमार नाईक यांच्या हस्ते करण्यात आले.**

यावेळी उद्योगपती रमेश अग्रवाल, लालाभाई अग्रवाल, माजी उपनगराध्यक्ष प्रकाश पाटील, दी सुटेक्स बँक नवापूर शाखेचे व्यवस्थापक जयदीप भाई देसाई, किरण टिभे, शंकर दर्जी, अजय अग्रवाल साई मंदिराचे अध्यक्ष राकेश राणा उपाध्यक्ष रामकृष्ण पाटील आदी मंचावर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला उपस्थित मान्यवरांच्या सत्कार साई मंदिराचे अध्यक्ष राकेश राणा, रामकृष्ण पाटील व संचालक मंडळातर्फे करण्यात आला. येणारा काळात साई मंदिरासाठी भरीव मदत करण्याचे आश्वासन आ.नाईक यांनी दिले. कार्यक्रमाला संचालक मंडळ, सल्लागार व आमंत्रित सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.सूत्रसंचालन मंदिराचे सहसचिव प्रकाश खैरनार यांनी केले तर आभार सचिव कृष्णा पाटील यांनी मानले.

## जिल्हा बँकेत ठेवीदारांना पाच लाखांचे विमा संरक्षण

**शिंदखेडा, दि.२१ (प्रतिनिधी)- जिल्हा बँकेत ठेवी ठेवणे हे अत्यंत सुरक्षित झाले असून ठेवीदाराला पाच लाखांचे विमा संरक्षण कवच प्राप्त झाले आहे. जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी जिल्हा बँकेत ठेवी ठेवण्याचे आवाहन करण्यात आले.**

तालुक्यातील परसामळ या गावी धुळे व नंदुरबार जिल्हा बँकेतर्फे माजी जि.प.सदस्य जयसिंग आप्पा गिरासे यांच्या प्रमुख उपस्थितीत तसेच वि.का.सोसायटीचे चेअरमन निंबा राजाराम पाटील यांचे अध्यक्षतेखाली ठेवी मेळावा आयोजित करण्यात आला होता. या मेळाव्यात बँकतर्फे एस. बी.खाटीक यांनी बँकेच्या विविध योजनांची माहिती विषद केली.

मेळाव्यात काही शेतकरी सभासदांनी ठेव रक्कम रोखीने दिले तर काही शेतकऱ्यांनी एक दोन दिवसांत ठेव ठेऊ असे आश्वासन दिले. या कार्यक्रमास गावातील ग्रामस्थ व वि.का.सोसायटीचे सभासद, आजी माजी सरपंच, ग्रा.पं.सदस्य, तसेच बँकेचे विभागीय अधिकारी दिलीप चौधरी, विशेष वसूली अधिकारी, एन.व्ही पेंढारकर, तपासणीस शकील बाबुलाल खाटीक, महेंद्र जगन्नाथ पाटील, भाऊसाहेब युवराज महाले आदी बँक कर्मचारी उपस्थित होते.

## नागरिकांनी राष्ट्रध्वजाचा मान राखावा : पोलिस अधि.श्रीकांत धिवरे

**धुळे, दि.२१- नागरीकांनी राष्ट्रध्वजाचा वापर करतांना योग्य ती काळजी घेऊन मान राखावा, असे आवाहन पोलिस अधीक्षक श्रीकांत धिवरे यांनी एका प्रसिद्धी पत्रकान्वये केले आहे.**

धिवरे यांनी म्हटले आहे, दरवर्षी २६ जानेवारी रोजी प्रजासत्ताक दिन हा देशभर साजरा करण्यात येतो. समारंभाचे विविध शासकीय, निमशासकीय तसेच खासगी संस्थांमार्फत ध्वजारोहण करण्यात येते. स्थानिक पातळीवर जनतेमार्फत राष्ट्रीय ध्वजाविषयी असलेले प्रेम, निष्ठा, अभिमान दर्शविण्याकरीता वैयक्तिकरीत्या छोट्या राष्ट्रध्वजाचा वापर करण्यात येतो. राष्ट्रध्वजाचा योग्य तो मान राखला जावा. यासंदर्भात शासनामार्फत वेळोवेळी सूचना दिल्या आहेत. तसेच जाणीवपूर्वक जर राष्ट्रध्वजाचा अवमान करण्याचा प्रयतक केल्यास राष्ट्रीय अवमान प्रतिबंध कायदा-१९७१ चे कलम २ अनुसार कारवाई करण्यात येते. काही वेळा राष्ट्रीय कार्यक्रमांच्या वेळी तसेच विविध कला, क्रीडा प्रसंगी वैयक्तिक रीत्या वापरण्यात येणारे राष्ट्रध्वज नंतर इतरत्र टाकण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे. जेणेकरुन नंतर हे छोटे-छोटे राष्ट्रध्वज रस्त्याचे कडेला किंवा इतरत्र ठिकाणी पडलेले, विखुरलेले आढळतात. हे दृश्य राष्ट्रीय प्रतिष्ठेला शोभणारे नसल्याने राष्ट्रध्वजाचे वापरानंतर एकतर त्याचा योग्य तो मान राहील याप्रमाणे ते ठेवण्यात यावे. अथवा शासकीय संस्था, तसेच इतर संघटनांना सुपूर्द करावे. सदर अशासकीय संस्था व संघटनांनी त्यांना शासनाने दिलेल्या अधिकारानुसार सदरचे राष्ट्रध्वज मा. जिल्हाधिकारी व तहसीलदार यांच्याकडे सुपूर्द करावेत.

रस्त्यात पडलेले इतरत्र विखुरलेले राष्ट्रध्वज दिसणे राष्ट्र प्रतिष्ठेच्या दृष्टीने ही बाब अत्यंत गंभीर असल्याने केंद्र शासनाच्या गृहमंत्रालयाने दिलेल्या निर्देशानुसार राष्ट्रध्वजाकरीता प्लॉस्टिकच्या वापरास मान्यता नाही. प्लास्टिकचे ध्वजाचा वापर पूर्णपणे बंद करावा. जनतेच्या वैयक्तिक वापरासाठी छोट्या कागदी ध्वजाचा वापर करण्यात यावा. तथापि, अशा कागदी ध्वजाचा वापर करताना त्याचा योग्य तो मान राखणे आवश्यक आहे. राष्ट्रध्वजाचा अवमान होणार नाही यांची सर्व नागरिकांनी काळजी घ्यावी असेही पोलिस अधीक्षक श्री. धिवरे यांनी नमूद केले आहे.

## जिल्ह्यातील उमेदवारांना इस्त्रायल येथे रोजगाराची संधी

नंदुरबार, दि.२१ (प्रतिनिधी)- कौशल्य, रोजगार उद्योजकता व नाविन्यता विभागांतर्गत जिल्ह्यातील उमेदवारांना, इस्त्रालय देशामध्ये रोजगाराची संधी उपलब्ध करून देण्यात येत असल्याची माहिती कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे सहायक आयुक्त विजय रिसे यांनी कळविले आहे.इस्त्रालय देशामध्ये घरी काळजी घेणारा या पदासाठी भरती प्रक्रिया चालू आहे. या पदासाठी पात्रतेचे निकष व जाहिरातीचा तपशिल संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. इंग्रजी भाषेचे सामान्य ज्ञान असणाऱ्या वय वर्ष २५ ते ४५ वयोगटाचे उमेदवार या योजनमध्ये सहभागी होणास पात्र आहेत. सोबतच उमेदवारांकडे काळजीवाहु (घरगुती सहायक) सेवांसाठी निपुण/पारंगत, भारतातील नियामक प्राधिकरणाद्वारे मान्यता प्राप्त असलेले व किमान ९९० तासांचा कोर्स पुर्ण केलेले प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.






**रक्तदान हेच सर्वश्रेष्ठ दान**

### जाहीर नोटीस

**शहादा येथील मा.कार्यकारी दंडाधिकारी सो. यांचे न्यायालयात**

फौजदारी कि.अर्ज नं.५१/२०२५

**श्री.किशन लक्ष्मण पाडवी,** वर्षे, धंदा- मजुरी,
रा.जावदे त.बो., ता.शहादा, जि.नंदुरबार. ..... **अर्जदार**

**विरूध्द**

जन्म मृत्यू निबंधक अधिकारी
जावदे त.बो., ता.शहादा, जि.नंदुरबार. ..... **गैरअर्जदार**

ज्याअर्थी अर्जदार यांचे वडील लक्ष्मण सत्तरसिंग पाडवी यांचा मृत्यू दि.३१/११/१९९९ रोजी मौजे.जावदे त.बो., ता.शहादा जि.नंदुरबार येथे झाला असल्याने अर्जदाराने दि.११/०८/२०२३ रोजी चा जन्म-मृत्यू नोंदणी सुधारणा अधिनियम २०२३ चे कलम ११(३) अन्वये प्रमाणे जन्म-मृत्यू दाखला मिळणेसाठी शहादा येथील मा.कार्यकारी दंडाधिकारी सो.शहादा यांचे न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी वरील अर्जा संदर्भात कोणास काही म्हणणे अगर हरकत सादर करावयाचे असल्यास ते सादर करण्यासाठी दि.०४/०२/२०२५ रोजी किंवा १५ दिवसांचे आत दुपारी ०२.३० वाजता स्वतःअगर वकिलांमार्फत शहादा येथील मा.कार्यकारी दंडाधिकारी सो.शहादा यांचे न्यायालयात हजर राहून लेखी म्हणणे सादर करावे.

तरी तमाम जनतेस या नोटीसीने कळविण्यात येते की, वर नमूद केलेल्या दिवशी कोणीही व्यक्ती स्वतःअगर आपल्या वकिलामार्फत हजर न झाल्यास सदर अर्जात पुढील योग्य ते हुकुम होतील याची नोंद घ्यावी.

आज दिनांक २०/०१/२०२५ रोजी माझे सहीनिशी व शिक्यानिशी सदरची जाहीर नोटीस दिली आहे.

आदेशावरून

(कोर्टाचा शिक्का)

**कार्यकारी दंडाधिकारी**
**तथा तहसिलदार शहादा**

---

**श्री.सुशील पी.पंडीत** ॲडव्होकेट, शहादा ता.शहादा, जि.नंदुरबार
**श्री.बी.जे.जयस्वाल** ॲडव्होकेट, शहादा ता.शहादा, जि.नंदुरबार
**श्री.प्रभु एन. गुरव** ॲडव्होकेट, शहादा ता.शहादा, जि.नंदुरबार

### जाहीर नोटीस

**म.दिवाणी न्यायाधीश सो. (क.स्तर) शहादा यांचे कोर्टात**

दि.कि.अर्ज नं.१५/२०२५

श्री.सच्चिदानंद सुभाष चौहान, उ. व. ४० वर्ष, धंदा - नोकरी
रा. प्रकाशा ता. शहादा जि. नंदुरबार ..... **अर्जदार**

**//विरूध्द//**

कोणीही नाही ..... **सामनेवाला**
कै.सुभाष ओंकार लोहार ..... **मयत**

अर्जः- दि बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चॅप्टर VIII चे कलम २ व ७ प्रमाणे वारस दाखला (Legal Heirship Certificate) मिळणेसाठी

ज्याअर्थी कै.सुभाष ओंकार लोहार यांचा मृत्यू दि. १५/१०/२०२१ रोजी मौजे प्रकाशा ता.शहादा जि. नंदुरबार येथे झाला ते प्रकाशा ता. शहादा येथील रहिवासी होते. त्यांचे पश्चात त्यांना १) श्रीमती लताबाई सुभाष लोहार, २) सुनिता मनोज लोहार, ३) ममता संजय लोहार, ४) सच्चिदानंद सुभाष चौहान, ५) वृषाली योगेश लोहार ६) वृंदा सुभाष लोहार असे एकूण ०६ वारस असल्याने वर नमूद अर्जदाराने सन १८२७ चे बॉम्बे रेग्युलेशन ॲक्टमधील ८ चे कलम २ व ७ प्रमाणे वारस दाखला मिळणेसाठी शहादा येथील म.दिवाणी न्यायाधीश सो. (व.स्तर) यांचे कोर्टात दि. कि. अर्ज नं. १५/२०२५ अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी वरील अर्जासंदर्भात कोणास काही म्हणणे अगर हरकत सादर करावयाचे असल्यास ते सादर करण्यासाठी दि.०७/०२/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता स्वत: अगर वकिलांमार्फत शहादा येथील मे.दिवाणी न्यायाधीश, सो. व.स्तर, शहादा यांचे न्यायालयात हजर राहून लेखी म्हणणे सादर करावे.

तरी तमाम जनतेस या नोटीसीने कळविण्यात येते की, वर नमुद केलेल्या दिवशी कोणीही व्यक्ती स्वत: अगर आपल्या वकिलांमार्फत हजर न झाल्यास सदर अर्जाच्या बाबतीत कोणाचीही काहीएक तक्रार नाही असे गृहीत धरण्यात येवून सदर अर्जात पुढील योग्य ते हुकुम होतील याची नोंद घ्यावी.

आज तारीख- १८/०१/२०२५ रोजी माझे सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी सदरची जाहीर नोटीस दिली आहे.

आदेशावरून

**क.लिपीक** (कोर्टाचा शिक्का) **अधिक्षक**
**म.दिवाणी न्यायालय, व.स्तर, शहादा**













पान १ वरुन

## मतदार दिनी राज्यभर आंदोलन

सोमनाथ सुर्यवंशी यांचा पोलिसांच्या मारहाणीत मृत्यू झाला. पोलीसांनी कोंबिग ऑपरेशनवेळी सोमनाथ सुर्यवंशीला अटक करुन कोठडीत मारहाण केल्याने मृत्यू झाला. पण मुख्यमंत्री फडणवीस यांनी विधानसभेत खोटी माहिती दिली. दम्याच्या आजाराने सुर्यवंशी यांचा मृत्यू झाल्याचे त्यांनी सांगितले, त्याविरोधात हक्कभंग आणणार आहोत. पण परभणीत कोंबिंग ऑपरेशनचे आदेश कोणी दिले, त्याची चौकशी झाली पाहिजे व सोमनाथ सुर्यवंशी यांच्या हत्येस जबाबदार सर्वांवर कारवाई करावी.

बीडमध्ये सरपंच संतोष देशमुख यांची अत्यंत निघृणपणे हत्या करण्यात आली. बीड जिल्ह्यात खून, खंडणी, अपहरण, भ्रष्टाचार प्रचंड वाढलेला आहे, बीडमधील माफियाराज सत्तेतील एका मंत्र्याच्या आशिर्वादानेच सुरु आहे. सत्ताधारी पक्षाचा एक आमदारच बीडमधील माफियाराजची माहिती जाहिरपणे देत आहे पण सरकार चौकशीचा फार्स असून सत्तेची खूर्ची वाचवण्यासाठी सरकारचा हा प्रयतक सुरु आहे, असेही नाना पटोले म्हणाले.

**पालकमंत्रीपदाचा वाद मलईसाठी..**

राज्यात सत्तेवर आलेल्या सरकारमध्ये सुरुवातीपासूनच वाद आहेत. सरकार स्थापन करताना मुख्यमंत्रीपदावरून वाद होता. त्यानंतर मंत्रिमंडळ विस्तार व खातेवाटपावरुन वादावादी आणि आता पालकमंत्रीपदासाठी वाद सुरु आहेत. मुख्यमंत्री परदेश दौऱ्यावर गेले पण त्यांना तेथून नाशिक व रायगड जिल्ह्याच्या पालकंमत्रीपदाला स्थगिती द्यावी लागली. पालकमंत्र्याबरोबर सहपालकमंत्री पद हे दोघे मिळून खाऊ यासाठी तयार केले आहे, असेही पटोले म्हणाले.

## व्हाइट टी-शर्ट अभियानाची घोषणा

होती. या घटनेला आता ९० वर्ष पूर्ण होत असताना राहुल गांधी यांनी खादीच्या पुढे जात व्हाइट टी-शर्टवर भर दिला आहे. दोन वर्षांपूर्वी राहुल गांधी यांनी भारत जोडो यात्रेदरम्यान व्हाइट टी-शर्ट आणि खाकी ट्राऊजरचा वापर सुरू केला. भारत जोडो यात्रा दिल्ली आणि उत्तर भारतात पोहोचली असताना कडाक्याच्या थंडीतही राहुल गांधी फक्त या पांढऱ्या टी-शर्टवर दिसून आले. आता राहुल गांधी यांनी सर्वांसाठी न्याय आणि भविष्याच्या समान विकासासाठी व्हाइट टी-शर्ट मूव्हमेंटची घोषणा रविवारी केली. काँग्रेसमधील एका नेत्याच्या मतानुसार, गरीब असो किंवा श्रीमंत प्रत्येक जण व्हाइट टी-शर्टशी जोडला जाऊ शकतो. महात्मा गांधी यांनी जेव्हा स्वराज्याविषयी बोलायला सुरुवात केली, तेव्हा त्यांनी चरखा, खादी आणि टोपी यांचा प्रतीकाप्रमाणे वापर केला. आम्हालाही राहुल गांधींच्या न्यायप्रिय राजकारणासाठी एका चिन्हाची गरज आहे, त्यामुळे पांढरा रंग निवडला जो शांती आणि सौहार्दाचे प्रतीक आहे.

## पिक योजना वादाच्या भोवऱ्यात

एखाद्या योजनेत भ्रष्टाचार असला म्हणजे ती योजनाच बंद करावी, हे काही सोल्यूशन नाही. शासनात भ्रष्टाचार सुरु आहे तर काय शासन बंद करणार काय, असा प्रश्नही त्यांनी उपस्थित केला असून राज्यात चार लाख अर्ज बोगस असल्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. खासदार सुप्रिया सुळे यांनीही राज्यशासनावर टीका करीत शेतकऱ्यांच्या योजना बंद करु नका, अशी प्रतिक्रीया दिली आहे. ही योजना बंद झाल्यास शेतकऱ्यांच्या आत्महत्या वाढतील, अशी भीती व्यक्त करण्यात येत आहे.

## परिक्रमा खंडपिठ नाशिकऐवजी धुळ्यात..

धुळे, जळगाव, नंदुरबार या जिल्ह्यासाठी गैरसोयीचे देखील आहे. त्या ऐवजी जर धुळे जिल्ह्यात परिक्रमा खंडपिठ सुरु करण्यात आले. तर लगतच्या जिल्ह्यांतील ग्राहकांना देखील त्याचा फायदा होणार आहे. सध्याच्या स्थितीत नाशिक येथील परिक्रमा खंडपिठात जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोगाने दिलेल्या निकालावरील अपील तसेच २० लाखावरील फसवणुकीच्या तक्रारींची संख्या मोठी आहे. प्रलंबीत तक्रारींचा तातडीने निपटारा होण्याच्या उद्देशाने धुळे जिल्ह्यात परिक्रमा खंडपिठ सुरु करण्यात यावे. तसेच या परिक्रमा खंडपिठासाठी स्वतंत्र मणुष्यबळ देखील उपलब्ध करुन देण्यात यावे. जेणे करुन परिक्रमा खंडपिठातील दाखल प्रकरणांचा मुदतीत निपटारा होवुन ग्राहकांना खऱ्या अर्थाने न्याय मिळण्यास मदत होईल. धुळे शहर हे नंदुरबार जिल्ह्यापासुन १०० किलो मिटर व जळगाव जिल्हा मुख्यालया पासुन १०० किमी अंतरावर आहे. त्या उलट नाशिक शहर हे धुळे, नंदुरबार आणि जळगाव या तिन्ही जिल्ह्यातील ग्राहकांच्या दृष्टीने लांबपल्याचे आहे. नाशिक येथे तक्रार दाखल करण्यासाठी गेल्यास ग्राहकांचे दोन दिवस जातात. त्या उलट धुळे येथे परिक्रमा खंडपिठ सुरु झाले.तर धुळे, नंदुरबार व जळगाव या तिन्ही जिल्ह्यातील ग्राहकांची गैरसोय थांबण्यास मदत होईल. तसेच वेळ आणि पैश्यांची देखील बचत होईल. सध्या जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग कार्यालयाच्या परिसरात उपलब्ध असलेली जागा. तसेच तिन्ही जिल्ह्यातील ग्राहकांच्या हिताच्या दृष्टीने धुळे जिल्ह्यात परिक्रमाण खंडपिठ सुरु करण्यासाठी अन्न व नागरी पुरवठा मंत्री महाराष्ट्र शासन यांच्याकडे पाठपुरावा करत परिक्रमा खंडपिठ धुळ्यात सुरु करण्याची मागणी जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, वकील संघाच्या वतीने करण्यात आली. या संदर्भात जिल्हाधिकारी पापळकर यांना निवेदन देण्यात आले.यावेळी अध्यक्ष ॲड.वाल्मीक कचवे, उपाध्यक्ष ॲड.योगेश खैरनार, सचिव ॲड.पराग खानकरी, ॲड.मंगला चौधरी, ॲड.अमोल पाटील, ॲड.मंथन साळुंखे, ॲड. डी.यु.देवरे, ॲड.एस.आर.पेशवे, ॲड.एम.बी.पवार, ॲड.एम. व्ही.घरटे, ॲड.पी.आर.सोनार, नंदुरबार येथील ॲड.शेख फराज रईसोद्दीन, ॲड.अर्जुन महाले, ॲड.उज्वल चौधरी आदिंनी केली.

## पासष्ट लाखांचा अवैध मद्यसाठा पकडला

मद्यसाठा हा पंजाब राज्यात विक्रीचा परवाना असतांना इतर राज्यांत चोरटी विक्री करण्याचे कारस्थान असल्याचे उघडकीस आले आहे. याप्रकरणी नरडाणा पोलीस स्टेशनला म.पो.का.क. ६५(अ), ६५(ई), ८०(१)(२) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे, अपर पोलीस अधीक्षक किशोर काळे, उपविभागीय पोलीस अधीकारी सुनिल गोसावी, नरडाणा पोलीस स्टेशनचे सपोनि. निलेश मोरे, पोउनि.मनोज कुवर, अजय सोनवणे, ललित पाटील, विक्रांत देसले, भुरा पाटील, भरत चव्हाण, राकेश शिरसाठ, रविंद्र मोराणीस, चंद्रकांत साळुंखे, नारायण गवळी, साहेबराव पावरा, गजेंद्र पावरा, अर्पण मोरे, विजय माळी, सुरजकुमार सावळे यांनी केली.

## डॉ.वर्षा लहाडेंची तात्काळ बदली करण्याची मागणी

तक्रारींचा पाढा वाचला. तसेच पक्षाच्या माध्यमातून सदर महिला अधिकाऱ्याची बदली होण्यासाठी पाठपूरावा करण्याची विनंती केली. लवकरच जिल्हा शल्य चिकित्सक यांची बदली होईल, असे आश्वासन डॉ.मोरे यांनी दिले. अध्यक्ष डॉ.जर्मनसिंग पाडवी, कार्याध्यक्ष डॉ.सुरेश ठाकरे, सचिव डॉ.अजित कोठारी आदींसह नऊ डॉक्टरांनी निवेदन दिले. यापुर्वीही डॉ.लहाडे यांच्या विरोधात विविध आदिवासी संघटनांनी निवेदन देत बदलीची मागणी केली आहे.

## मारहाण करणाऱ्यांवर पोलिसांची कृपादृष्टी

उपलब्ध नसताना, त्याला अटक करून तुरुंगात डांबले, पोलीस मारहाणीत त्याचा मृत्यू झाला. त्यावेळी काढलेल्या पत्रकात मी स्वच्छपणे व स्पष्टपणे म्हटले होते की, मपोलिसांकरवी मारहाण करून मुडदे पाडणे हा नवीन देवेंद्र पॅटर्न आहे.फ बदलापूर प्रकरणातील संशयित आरोपी अक्षय शिंदे याची पोलिसांनी हत्या केली. यावर माननीय उच्च न्यायालयाने शिक्कामोर्तब केले आहे. त्यामुळे माझ्या आरोपावर माननीय उच्च न्यायालयाने सहमती दर्शवलेली आहे. पोलिसांना हाताशी धरून धुळे जिल्ह्यातील शिंदखेडा मतदारसंघात गेल्या दहा वर्षात कसा नंगानाच घालण्यात आला. याचे उदाहरण सर्वांसमोर आहेच. महसूल कर्मचाऱ्यांच्या आंदोलनाला आमचा पाठिंबा आहे. आंदोलनाचा मलॉजिकल एंडफ होत नाही, तोपर्यंत त्यांनी कुठल्याही परिस्थितीत माघार घेऊ नये. अन्यथा बाकीच्या कर्मचाऱ्यांवरही असे प्रसंग उद्धवतील व ही नित्याची बाब होऊन जाईल. असे परखड मतही शिवसेना नेते, कार्यसम्राट माजी आ.अनिल गोटे यांनी पत्रकातून व्यक्त केले आहे.



## चाळीसगांवात वीज चोरांविरुध्द धडक कारवाई
## शंभरहून अधिक मीटरमध्ये फेरफार उघडकीस

**चाळीसगाव, दि.२१- महावितरण मार्फत चाळीसगांव विभागांतर्गत १७ जानेवारी रोजी कार्यकारी संचालक धनंजय औंढेकर मुख्य अभियंता आय.ए. मुलाणी, जळगावचे अधिक्षक अभियंता अनिल महाजन, चाळीसगांव विभागाचे कार्यकारी अभियंता नितीन घुमरे व अति. कार्यकारी अभियंता रवींद्र जाधव यांच्या उपस्थितीमध्ये महावितरणच्या चाळीसगांव विभागाच्या पथकाने शुक्रवारी चाळीसगांवात दिवसभर वीज ग्राहकांच्या घरांची मीटर तपासणी केली. यावेळी ११९ वीजग्राहकांनी मीटरमध्ये फेरफार केल्याचे आढळल्यानंतर त्यांचे मीटर जप्त करण्यात आली असून महावितरण कंपनीच्या नियमाप्रमाणे दंडात्मक कारवाई सुरु आहे.**

पथकाने चाळीसगांव शहरातील व ग्रामीण भागातील ग्राहकांच्या घरांची मीटर तपासणी केली. यात सुमारे ७९९ वीजमीटरची तपासणी केली. यावेळी ११९ ग्राहकांच्या मीटरमध्ये फेरफार करून वीजचोरी होत असल्याचे निदर्शनास आले. यामुळे मीटरची गती कमी होऊन, ग्राहकांना वीज बिल कमी येते. महावितरणच्या अधिकाऱ्यांनी हे मीटर जप्त केले असून, त्यांच्यावर दंडाची कारवाई सुरू केली आहे. दंड नाही भरला तर गुन्हा दाखल केला जाणार आहे. चाळीसगांवात आता महावितरणतर्फे ही कारवाई यापुढेही सुरु राहणार आहे. त्यामुळे ज्या वीज ग्राहकांनी मीटरमध्ये फेरफार केला असेल, त्यांनी स्वतःहून कंपनीकडे ती वीज मीटर जमा करावे, असे आवाहन चाळीसगांव विभागाचे कार्यकारी अभियंता नितीन घुमरे यांनी केले आहे. सदर मोहिमेमध्ये जळगाव मंडळामधील विभागीय स्तरावरील पथकांनी सहभाग घेतला.

पान १ वरुन

## पाच कोटींची महसूल थकबाकी

जमीन महसूल अधिनियम १९६६ च्या कलम १७९ नुसार मालमत्ता अटकावून जप्तीची कारवाई केली जाईल. पुढील टप्प्यात या मालमत्तेची विक्री करून रक्कम शासनात जमा केली जाईल.

थकबाकीदारांनी दिलेल्या मुदतीत वसूली रक्कम भरून कारवाई टाळावी, अन्यथा कठोर उपाययोजना करण्याशिवाय शासनास पर्याय उरणार नाही, सर्व संबंधितांनी याची नोंद घेऊन तत्काळ थकबाकी भरावी, असे आवाहन तहसिलदार डॉ.जी.व्ही.एस. पवनदत्ता यांच्या वतीने करण्यात आले आहे.

## महिला आरोपीची गळफास घेत आत्महत्या

यांनी दिलेल्या खबरीनुसार, कारागृहातील इतर बंदिवान महिला बॅरेक समोर बसून जेवण करत असतांना बंदीवान महिला स्वच्छतागृहाच्या मागे गेल्याचे पाहिले. त्यानंतर बंदिवान महिला लाल ओढणीच्या सहाय्याने गळफास घेतलेल्या स्थितीत आढळून आली. कारागृह वैद्यकीय अधिकारी डॉ.एस.एस.पाटील यांनी तपासून मयत घोषित केले. या प्रकरणी शहर पोलीस स्टेशनला नोंद करण्यात आली आहे.

## जिल्हा प्रशासनावर नामुष्कीची वेळ

आरोपीचा शहर पोलीस शोध घेत आहेत. हे संशयित आरोपी नक्की केव्हा सापडतील हा एक प्रश्न असला तरी तहसिल कार्यालयाचे कामकाज जिल्ह्यात ठिकठिकाणी बंद होत असल्याने जनतेचे हाल सुरु झाले आहेत. अनेकांची महत्वाची कामे रखडली आहेत. जिल्हा प्रशासनावर या घटनेमुळे नामुष्कीची वेळ आली आहे. एवढी मोठी पोलीस यंत्रणा असतांना जबाबदार व्यक्ती का सापडत नाही? असा सवाल जनतेमध्ये चर्चेचा झाला आहे.

## साक्रीत श्री शिवमहापुराण कथा

काढण्यात येणार आहे. कथा ही अंबापुर रोड, हायवेला लागून फौजी पेट्रोल पंपा समोर ५२ एकर जागेत कथा होणार असून १५ एकर जागेत भव्य सभा मंडप उभारण्यात आला आहे तसेच सभामंडपाला लागून भोजन कक्ष तयार करण्यात आले आहे, या कथेसाठी येणाऱ्या भाविकांसाठी पूर्वेकडे शेवाळी फाट्याला लागून ४० एकर जागेत पार्किंग करण्यात आली आहे. तर पश्चिमेस वीस एकर जागेत पार्किंग करण्यात आली आहे. या ठिकाणी २०० सुलभ शौचालय तयार करण्यात आले आहे. पाण्याची कमतरता भासू नये म्हणून तेरा पाण्याचे टँकर तसेच स्वतंत्र नळ पाणीपुरवठा योजना, दोन बोअरवेल, दोन विहिरी या ठिकाणी पाण्यासाठी तयार ठेवण्यात आले आहे. प्रत्येकाला महाराजांची कथा पाहता यावी व ऐकता यावी यासाठी १२ एलईडी स्क्रीन बसवण्यात येत आहेत. तसेच विजेची कमतरता भासू नये म्हणून स्वतंत्र सात जनरेटर, दोन ट्रान्सफार्मर लावण्यात आले आहेत. ६ ते ७ लाख भाविक उपस्थित राहतील असा अंदाज आयोजकांनी केला आहे.

### निधन वार्ता

## कमल वैद्य



धुळे, दि.२१- जळगाव शहरातील नवीन जोशी कॉलनीतील रहिवासी कमल वसंत वैद्य यांचे वृध्दापकाळाने निधन झाले. मृत्यूसमयी त्या ८४ वर्षांच्या होत्या. त्यांची अंत्ययात्रा दि.२२ जानेवारी रोजी सकाळी नऊ वाजता राहत्या घरापासून काढण्यात येणार आहे. त्यांच्या पश्चात एक मुलगा, सुना, नातवंडे असा परिवार आहे. त्या प्रदीप वैद्य यांच्या मातोश्री होत.

## सोनगीर वि.का.संस्थेच्या कार्यकारी मंडळाची निवडणूक बिनविरोध

**सोनगीर, दि.२१ (प्रतिनिधी)- येथील विकास कार्यकारी सहकारी संस्थेच्या कार्यकारी मंडळाची पंचवार्षिक निवडणूक प्रक्रिया सुरू असून १३ जागांसाठी ७२ जणांनी उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत. स्थापनेपासून या संस्थेची निवडणूक बिनविरोध पार पडली आहे.**

या विकास कार्यकारी सहकारी संस्थेचे ६५७ सभासद मतदार आहेत. सदर संस्थेची स्थापना १९१६ ला झाली आहे. ११० वर्षांची वैभवशाली परंपरा संस्थेला लागली आहे. संस्थेच्या टर्नओव्हर दीड कोटी रुपये असुन संस्थेकडून १२२ सभासदांनी कर्ज घेतले आहे. धुळे जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या माध्यमातून संस्थेमार्फत शेतकऱ्यांना शेतीसाठी कर्ज पुरवठा केला जातो. दरवर्षी संस्थेची शंभर टक्के कर्ज वसुली होते. संस्थेच्या कार्यकारी मंडळाची निवडणूक प्रक्रिया सुरू असून १३ जागांसाठी १६ फेब्रुवारी रोजी मतदान होणार आहे. कार्यकारी मंडळात कर्जदार सभासद आठ जागा, अनुसूचित जाती/जमाती एक जागा, महिला प्रतिनिधी दोन जागा, इतर मागासवर्गीय एक जागा, भटक्या विमुक्त जाती/जमाती व विशेष मागास प्रवर्ग एक जागा. अशा १३ जागांसाठी निवडणूक प्रक्रिया राबविण्यात येत आहे. या तेरा जागांसाठी ७२ सभासदांनी उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत. छाननी प्रक्रियेत सर्व अर्ज मंजूर झाले आहेत. ६ फेब्रुवारीपर्यंत उमेदवारी अर्ज माघार घेण्याची मुदत आहे. दरम्यान, यंदाच्या पंचवार्षिक निवडणुकीत मोठ्या प्रमाणावर चुरस पाहायला मिळत आहे. यापूर्वी या संस्थेच्या कार्यकारी मंडळाच्या सर्व निवडणुका बिनविरोध पार पडल्या आहेत. गावातील सर्वच पक्षाचे प्रमुख व्यक्ती गट तट पक्ष भेद विसरून एकत्र येतात व सदर संस्थेची पंचवार्षिक निवडणूक बिनविरोध पार पाडतात.दरम्यान, यंदाची निवडणूक बिनविरोध पार पडेल की मतदान होईल? याकडे सभासदांचे लक्ष लागून आहे. नितेश महाले निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून काम पाहत आहेत.

## कै.डॉ.घोगरे चौक स्मारक तोडल्याने मनपासमोर धरणे

**धुळे, दि.२१- शहरातील कमलाबाई शं.कन्या शाळेजवळील चौकाला पद्मश्री डॉ.घोगरे शैक्षणिक चौक असे नामकरण मनपातर्फे करण्यात आले, तसे स्मारक फलकही उभारण्यात आले. माजी आ.फारूक शाह यांनी विद्यार्थीनींसाठी जाण्या-येण्यासाठी ओव्हर ब्रीज उभारला. त्यावेळी डॉ. घोगरे स्मारक फलक त्रिमुर्ती कन्स्ट्रक्शन ठेकेदाराच्या माध्यमातून तोडण्यात आले.**

आ.शाह यांना स्मारक नव्याने उभारणीबाबत विनंती केली तरी देखील अद्याप काम झाले नाही. त्यासाठी एक दिवसीय धरणे आंदोलन करण्यात आले. तोडगा न निघाल्यास दि.२७ जानेवारी पासून बेमुदत उपोषण करण्याचा इशारा शिवाजीराव काकडे यांनी दिला आहे.

वांरवार स्मरणपत्र देवून पद्मश्री डॉ.घोगरे शैक्षणिक चौक स्मारक फलकाची पुन्हा उभारणी करण्यात आली नाही. दि.२७ जानेवारी पासून बेमुदत उपोषण करण्याचा इशारा राजु इंगळे, सुनिल देवरे, ॲड.चंद्रकांत जावळे, कमलाकर पाटील, नैनेश साळुंखे, अशोक सुडके, शरद बिरारी, आनंदराव चौधरी, संतोष खंडेलवाल, रियाज पठाण, संगिता चौधरी, विलास गायकवाड, राजु जाधव, शिवाजीराव काकडे यांनी दिला आहे.

## कै.सदाशिवराव माळी स्मरणार्थ कार्यक्रम

धुळे, दि.२१-देवपूर परिसरातील सौभाग्य लॉन्स येथे कै.सदाशिवराव शंकर माळी यांच्या स्मरणार्थ दि.२६ जानेवारी रोजी दुपारी चार वाजता विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान प्रा.उषा पाटील भुषविणार आहेत.अण्णासाहेब सदाशिवराव माळी विधायक ट्रस्टतर्फे श्रुती संगीत क्लासेसचा भक्तीगीतांचा कार्यक्रम होणार आहेत. डॉ.जगन्नाथ महाजन, डॉ.अभिनय दरवडे यांचा सत्कार सोहळाही होणार आहे. या कार्यक्रमासाठी उपस्थितीचे आवाहन कलावती माळी, क्रांती जंजाळे, डॉ.शिवमुर्ती खलाणे, डॉ.दीपक खलाणे, नितीन खलाणे, उदय महाजन, दशरथ महाजन, प्राचार्य बी.बी. महाजन, प्राचार्य एस.एन.माळी यांनी केले आहे.


**फ्लॅट भाड्याने देणे**
2 BHK फ्लॅट प्रथम मजला भाड्याने देणे आहे. नंदाई अपार्टमेंट, प्लॉट नं.६६, नेहरु हौसिंग सोसायटी, नवरंग पाण्याच्या टाकीजवळ, देवपूर, धुळे
-: संपर्क :-
9423979671
9730782843

**न्यू फ्लॅट विकणे आहे**
SSVPS कॉलेज जवळ, सिद्धी व्यंकटेश अपार्टमेंट, प्रभात नगर येथील 2 BHK, 3 BHK फ्लॅट विकणे आहेत.
-: संपर्क :-
महेश माळी
9665696658

**पाहिजे**
अकौन्टींगच्या कामासाठी हुशार व अनुभवी मुलगा किंवा मुलगी पाहिजे. टॅलीचे ज्ञान आवश्यक
साईबाबा रेडीमेड ॲण्ड होजिअरी
गल्ली नं.२, मुल्लाबाडा रोड, अकबर चौक, धुळे
9422286958
7350148955

सागवान लाकडाचे तयार दरवाजे चौकट फ्रेम, पॉलिश केलेले सागवान शटर्स, फ्लश डोअर, कोटींग दरवाजे, फायबर दरवाजे, RCC सिमेन्टचे कलर चौकट व खिडकी तसेच प्लास्टो कंपनीची पाण्याची टाकी इ. उत्तम क्वॉलिटी व वाजवी रेटमध्ये मिळण्याचे एकमेव ठिकाण..

शंकर विजय सॉ मिल
प्रकाश टॉकीज समोर, पारोळा रोड, धुळे.
मो. 9595397718, 9665886722

**पाहिजेत**
दुकान कामासाठी मुलगा पाहिजे - २ जागा
अकौन्टसाठी मुलगा-१
-: संपर्क :-
आकार इनोव्हेशन
महात्मा फुले पुतळ्याजवळ, IDFC बँकेच्या खाली, स्टेशनरोड, धुळे
भेटा : सकाळी १०.३० ते ८ पर्यंत

**पाहिजेत**
औषधांच्या होलसेल दुकानात माल लावणे, ऑर्डर काढणे इत्यादी कामासाठी महिला/पुरुष पाहिजेत. इंग्रजीचे जुजबी ज्ञान आवश्यक. समक्ष भेटावे.
फार्मेक्स डिस्ट्रीब्युटर्स
गल्ली नं.२, आग्रारोड, दिव्य ज्वेलर्सच्या पाठीमागे, धुळे

**पाहिजे**
मेडीकल दुकानासाठी अनुभवी मुलगा पाहिजे.
-: संपर्क :-
माया सेल्स
ग.नं.६, राणी मेडीकल समोर, धुळे
9422287166

**पाहिजेत**
• एच.आर.एक्झीकेटिव्ह : पदवीधर, २ ते ३ वर्ष अनुभव
• स्टोअर एक्झीकेटिव्ह : पदवीधर, ४-५ वर्ष अनुभव कॉम्प्युटर, स्किल । टायपिंग
• ड्रायव्हर : दहावी पास, चारचाकी लायसन्स धारक
संपर्क : महेंद्र मराठे (HR)
GJ Foods, जुनवणे
मो. 79721 75849

**पाहिजेत**
ऑफिस कामासाठी गरजू मुला-मुलींची त्वरीत भरती चालू आहे
वय : १८ ते ३० वर्षे/ शिक्षण १० वी पास/ नापास ते पदवीधर पगार : ७ हजारच्या पुढे
रहाणे + जेवण + मेडिकल मोफत
संपर्क :- वाडीभोकर रोड, धुळे/9657608459

**बंगलो व फ्लॅट विकणे आहे**
पारोळा रोड लगत कॉटन मार्केट जवळ 2 BHK फ्लॅट व 4 BHK बंगला विकणे आहे.
-: संपर्क :-
9822545666

**गरम पाण्याचा एकच उपाय...**
USHA Crompton Racold BAJAJ

गॅस गिझर
आजच खरेदी करा आणि मिळवा पाईप सोबत फिटिंग फ्री *...
57 वर्षापासून आपल्या सेवेत...
अधिकृत विक्रेते श्री महावीर इलेक्ट्रीक ॲण्ड टी.व्ही.
श्रीराम मंदिराजवळ, फुलवाला चौक, आग्रा रोड, धुळे ▪ फोनः 229162, 235763

**भाड्याने देणे आहे**
ग.नं.४ व ५ बोळ येथे एकविरा कॅसेटच्या वरील दोन गाळे, भगवा चौक येथे १०X१३ चे शॉप भाड्याने देणे आहे.
-: संपर्क :-
8888387548

**भाड्याने देणे आहे**
नगरपट्टी येथे लक्ष्मी डिजीटल समोर तळ घरातील १०X७० चे शॉप दोन्ही बाजुने शटर असलेले दुकान भाड्याने किंवा विकत देणे आहे.
-: संपर्क :-
प्रशांत भावसार फेटेवाले
9422287548

**भाड्याने देणे**
वलवाडी शिवार आधार नगरला लागून सर्व्हे नं.१२६ मधील पक्के गोडाऊन भाड्याने देणे आहे.
-: संपर्क :-
9011894666

**नवीन बंगला विकणे आहे**
अग्रवाल नगर मधील 4 BHK, २ हॉल, २ किचन, ऑफिस रुम, लिफ्टची सोय, प्रशस्त कार पर्किंगची जागेसह नवीन फर्निचरसह बंगला विकणे आहे.
-: संपर्क :-
9518509869

**दुकान भाडे कराराने देणे**
ग.नं.६ मधील १३X५४ ऑफिस, बँक व फायनान्ससाठी दुकान भाडे कराराने देणे आहे.
-: संपर्क :-
7498644970

**घर विकणे आहे**
वाडीभोकर रोड, श्रीराम नगर येथील ८ रुमचे दुमजली घर विकणे आहे.
-: संपर्क :-
9322009279


हे पत्र संपादक, मालक, प्रकाशक, हेमंत सुधाकर मदाने यांनी हेमंत प्रिंटींग प्रेस, वीर सावरकर मार्ग, धुळे येथे मुद्रित करुन आपला महाराष्ट्र, जनशक्ती, वीर सावरकर मार्ग, धुळे-४२४००१ येथे प्रकाशित केले. दुरध्वनी मुख्य कार्यालय, धुळे (०२५६२) २३५३९६, २३८३९६, aplamaha@gmail.com नंदुरबार २२३४४४ aplamahashd@gmail.com शहादा-२५६९३९, मालेगाव-२४३१३३६, नाशिक-२५७५९८९, पुणे-४००४११५, आपला महाराष्ट्र-रजि.नं.एम.एच.डी.आय.ए.१७ र.नं.११२२२/६०